# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in

Website : https://grahak.maharashtra.gov.in/


जा.क्र.राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/२७२७ दिनांक :- ९ एप्रिल, २०१५

**वाचा** :- १) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम

२) शासन अधिसूचना क्र. ग्रासंक.२०१४/६६४/प्र.क्र.१९७/ग्रा.सं.४, दि.१६ फेब्रुवारी, २०१५

३) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.

अ) राआ/महा./आस्था/नियुक्ती/अध्यक्ष जि.मं./२०१३/३३५, दि.०४.०२.२०१३

आ) राआ/महा./आस्था/नि व प/अध्यक्ष जि.मं./२०१३/२२३३, दि.२७.०६.२०१३

इ) राआ/महा./आस्था-३/जि.मं.कामकाज/२०१५/१६०५, दि.२३.०२.२०१५

४) श्री.विश्वास दौलतराव ढवळे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, जळगांव यांचे दि.२७.११.२०१४ व २७.०३.२०१५ चे अर्ज

५) श्री.विनायक रामजी लोंढे,मा.अध्यक्ष,जिल्हा मंच, बीड यांचा दि.०६.०५.२०१४ चा अर्ज

## -: कार्यालयीन आदेश :-

वरील क्र.१ च्या शासन अधिसूचनेनुसार श्री.विवेक र.सोनुने, तत्कालीन अध्यक्ष, जिल्हा मंच, बुलढाणा यांचा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण अध्यक्षपदाचा राजीनामा दि.११.११.२०१४ (म.नं.) पासून मंजूर करण्यात आलेला आहे.

उक्त श्री.सोनुने यांचे राजीनाम्यामुळे बुलढाणा जिल्हा मंचाचे अध्यक्षाचे पद रिक्त झाल्याने सदरील पदाचा अतिरीक्त कार्यभार या कार्यालयाच्या उक्त क्र.३ इ) च्या आदेशान्वये श्री.एम.के.वालचाळे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, अमरावती यांना पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे व त्यानुसार मा.श्री.वालचाळे दरमहा तिसरा व चौथा आठवडा बुलढाणा जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदाचा अतिरीक्त कार्यभार पाहत आहेत.

वरील क्र.४ च्या अर्जान्वये श्री.विश्वास दौलतराव ढवळे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, जळगांव यांनी बुलढाणा जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर व वरील क्र.५ च्या अर्जान्वये श्री.विनायक रामजी लोंढे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, बीड यांनी जळगांव जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर बदलीने पदस्थापना करण्याबाबत विनंती केलेली आहे.

सबब या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) श्री.विश्वास दौलतराव ढवळे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, जळगांव यांची विनंतीनुसार बदलीने बुलढाणा जिल्हा मंचाच्या अध्यक्षाचे रिक्त पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

२) श्री.विनायक रामजी लोंढे, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, बीड यांची विनंतीनुसार बदलीने जळगांव जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर उक्त श्री.ढवळे यांच्या जागी पदस्थापना करण्यात येत आहे.

३) पुढील आदेशापर्यंत बीड जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदाचा अतिरीक्त कार्यभार उस्मानाबाद जिल्हा मंचाचे अध्यक्ष मा.श्री.एम.व्ही.कुलकर्णी सोपविण्यात येत आहे व त्यानुसार मा.श्री.कुलकर्णी पुढील आदेशापर्यंत दरमहा पहिला आठवडा बीड जिल्हा मंच व उर्वरित दिवस उस्मानाबाद जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर कामकाज करतील.

तसेच या आदेशानुसार मा.श्री.ढवळे यांनी बुलढाणा जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर या कार्यालयाचा वरील क्र.३ इ) चा आदेश त्या दिनांकापासून रद्द होईल.

उक्त मा.श्री.ढवळे व मा.श्री.लोंढे यांची आदेशान्वये करण्यात येत असलेली बदलीने पदस्थापना त्यांचे विनंतीनुसार करण्यात येत असल्याने त्यांना बदली अनुदान व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील.

ASW 09/04/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,

१) श्री.विश्वास दौलतराव ढवळे,
मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, जळगांव

२) श्री.विनायक रामजी लोंढे,
मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, बीड

३) श्री.एम.व्ही.कुलकर्णी,
मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, उस्मानाबाद

**प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :**

१) मा.पालक सदस्य/सदस्या, जिल्हा मंच, जळगांव, बीड, उस्मानाबाद, अमरावती व बुलढाणा
२) मा.श्री.एम.के.वालचाळे, अध्यक्ष, जिल्हा मंच, अमरावती
३) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा.सदस्य/सदस्या, जिल्हा मंच, जळगांव, बीड, उस्मानाबाद, अमरावती व बुलढाणा
५) प्रबंधक विधी, राज्य आयोग, महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
६) प्रबंधक, जिल्हा मंच, जळगांव, बीड, उस्मानाबाद, अमरावती व बुलढाणा

- *हा आदेश राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्रच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.*

D:\SC MAH\apt\Transfer\Letters.doc